आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
७ एप्रिल २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

महावितरण कंपनी आता केवळ बिगर कृषी ग्राहकांना वीज वितरीत करणार, कृषी ग्राहकांना वीज वितरणासाठी स्वतंत्र कंपनी

मुंबईतल्या दहिसर ते काशीगाव तसंच मंडाळे ते चेंबुर मार्गावरच्या मेट्रो मार्गिकांचे उद्घाटन

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव अभियानाला आजपासून सुरुवात

**आणि**

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी पावणे २ लाख शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यायला राज्य सरकारची मंजुरी

**<><><><><>**

महावितरण कंपनीचे कृषी आणि बिगर कृषी अशा दोन कंपन्यांमध्ये विभाजन करायला राज्य सरकारनं आज मान्यता दिली. मुंबईत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याला मान्यता देण्यात आली. या आणि इतर मंत्रीमंडळ निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती आणि इतर सर्व बिगर कृषि ग्राहकांसाठीची वितरण यंत्रणा महावितरण कंपनी हाताळणार आहे. तर कृषी ग्राहकांसाठीची वितरण यंत्रणा एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड ही कंपनी हाताळणार आहे. २०२३ मध्ये या कंपनीची स्थापना झाली होती.*

*महावितरण कंपनीला भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणायलाही सरकारनं मंजुरी दिली. विभाजनानंतर सहा ते नऊ महिन्यांच्या कालावधीत महावितरण आयपीओ आणला जाईल. महावितरणनं सुमारे ३२ हजार ६७९ कोटी रुपयांचं कर्ज घेतलं आहे. त्यासाठी सरकार रोखे जारी करणार आहे.*

*महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबवायला मंत्रीमंडळान आज मंजुरी दिली. याअंतर्गत पुराच्या पाण्याचा निचऱ्यासाठी कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी शहरांसह, कृष्णा खोऱ्यातील पूराचा धोका कमी करण्यासाठी प्रतिबंधक आराखडे तयार केले जातील. तसंच आपत्तीचा फटका बसलेल्या नागरिकांना गृहकर्जात तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना कर्जासाठी सवलत मिळेल. राज्यात नवीन स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दीमत्ता विभाग सरकार स्थापन करणार आहे. तसंच Geospatial Technology अर्थात भू-स्थानिक तंत्रज्ञानचा वापर करण्यासाठी महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) कंपनी स्थापन करायला राज्य सरकारनं आज मान्यता दिली. )*

**<><><><>**

मुंबईत मेट्रो ९ आणि मेट्रो २ बी यांच्या पहिल्या टप्प्यांला आजपासून सुरूवात झाली. पश्चिम उपनगरात दहिसर ते काशीगाव तसंच पूर्व उपनगरात मंडाळे ते चेंबुर मार्गावर या मेट्रो धावणार आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**व्हीसी**

*(दहिसर–काशीगाव हा टप्पा ४ किलोमीटर ४०० मीटर इतक्या लांबीचा असून त्यावर दहिसर पूर्व, पांडुरंगवाडी, मिरागाव आणि काशिगाव अशी चार स्थानकं आहेत. दहिसर पूर्व इथून मेट्रो ९च्या पहिल्या टप्प्यातल्या मेट्रोला आज फडणवीस यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. मेट्रो ९च्या या टप्प्यात सकाळी पावणे सहा वाजल्यापासून ते रात्री ११ वाजेपर्यंत दर सहा मिनिटांच्या अंतराने मेट्रो उपलब्ध असेल.  ही सेवा मेट्रो ७ या मार्गाशी जोडल्यामुळे मीरा भाईंदर ते दक्षिण मुंबईत कुलाब्यापर्यंत अखंडित दळणवळण सुविधा उपलब्ध होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. या मार्गावरचा दुसरा टप्पाही यंदा वर्षअखेरीला सुरू होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.*

***होल्ड.. बाईट - फडणवीस***

*मेट्रो २ बीच्या मंडाळे ते चेंबुर या टप्प्याचं उद्घाटनही आज मुख्यमंत्र्यांनी केलं. चेंबुर इथे  डायमंड गार्डन मेट्रो स्थानकावरून या मेट्रोला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आलं. या टप्प्यात पाच स्थानकांचा समावेश असून हा टप्पा हार्बर रेल्वे मार्गावरच्या मानखुर्द स्थानकाशी जोडला जाईल. मेट्रो २बी वर सकाळी ६ वाजल्यापासून रात्री साडे दहा वाजेपर्यंत मेट्रो सेवा सुरू राहील. या दोन्ही मार्गांवर उद्यापासून नियमित सेवा सुरू होईल. ठाणे ते बोरीवली भुयारी मार्ग प्रकल्पासाठी खोदकामाचा प्रारंभही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. या दुहेरी बोगद्याचं खोदकाम टीबीएमच्या साहाय्यानं केलं जाणार आहे. देशातल्या पहिल्या पॉड टॅक्सी प्रकल्पाचं भूमिपूजनही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. मुंबईत कुर्ला ते वांद्रे-कुर्ला संकुल परिसरात हा प्रकल्प सुरू होणार आहे. या मार्गात दोनशे मीटरच्या अंतरावर २२ स्थानकं असतील. चालकाविना, बॅटरीवर चालणाऱ्या एका पॉड टॅक्सीमध्ये सहा प्रवासी बसू शकतील. दर १५ सेकंदांनी ही पॉड उपलब्ध असेल आणि प्रवाशांनी निवडलेल्या स्थानकवरच ती थांबेल. )*

**<><><><>**

राज्यात ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी १ लाख ८० हजाराहून अधिक  शेतकऱ्यांना सुमारे १२८ कोटी ६५ लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. हे नुकसान प्रामुख्यानं चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात झालं होतं.

**<><><><>**

जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्तानं आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते “माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव” या अभियानाचा प्रारंभ झाला. ग्रामीण जनतेला त्यांच्या दारात गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं हे अभियान राबवलं जात आहे. या अभियानाद्वारे ग्रामीण भागातली आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा शासनाचा संकल्प आहे. या अभियानात स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण तसंच संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यावर लक्ष केंद्रित करून आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिलं जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आलं आहे.

**<><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत ३० उमेदवारांनी ४२ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ७ अर्ज छाननीत बाद झाले. या निवडणुकीसाठी भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, वंचित बहुजन पक्ष आणि उर्वरित अपक्ष मिळून २३ उमेदवार रिंगणात आहेत.

**<><><><>**

राज्यात उपलब्ध निर्यात सुविधा केंद्रांचा प्रभावी वापर करून फळे आणि भाजीपाल्याची निर्यात वाढवण्याचे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले आहेत. मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात कृषी पणन मंडळाच्या कामकाजाची आढावा बैठक आज झाली त्यावेळी ते बोलत होते. मागील वर्षाच्या तुलनेत अधिक आंबा निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, यासाठी अतिरिक्त अमेरिकन निरीक्षक उपलब्ध करून देण्याबाबत अधिकाऱ्यांनी कृषी उत्पन्न निर्यात विकास प्राधिकरण अर्थात अपेडाकडे पाठपुरावा करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

<><><><>

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार ४ वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी ऑनर्स आणि संशोधनासह ऑनर्स असे दोन पर्याय राज्य सरकारनं उपलब्ध करुन दिले आहेत. याची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षांपासून केली जाणार आहे. तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना ऑनर्स किंवा संशोधनासह ऑनर्स हा पर्याय निवडावा लागेल.

<><><><>

यंदाचा 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' नोबेल पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ संगीतकार पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी आज या पुरस्काराची घोषणा केली. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८४व्या स्मृतिदिनी हा पुरस्कार प्रदान केला जाईल. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये संगीत क्षेत्रासाठी महेश काळे, नृत्यासाठी शमा भाटे, नाटक आणि चित्रपट क्षेत्रासाठी अभिनेता सुबोध भावे, चित्रपट क्षेत्रासाठी अभिनेत्री रवीना टंडन आणि प्राजक्ता माळी, पत्रकारिता क्षेत्रासाठी सुशील कुलकर्णी तर साहित्याच्या क्षेत्रात अच्युत गोडबोले यांचा समावेश आहे.

<><><><>

हिंगोली जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सर्व नियम पाळून, शांततेत साजरी करावी. तसंच डीजेचा वापर न करता पारंपरिक वाद्य, व्याख्यानमाला, समाज उपयोगी कार्यक्रम घेऊन साजरी करावी असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे. आज झालेल्या शांतता समिती बैठकीत ते बोलत होते.

<><><><>

राज्य परिवहन अर्थात एसटी महामंडळाला गेल्या शैक्षणिक वर्षात शालेय सहलींसाठी केलेल्या २५ हजार ५५८ बस फेऱ्यांमधून १२७ कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळालं असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी

दिली आहे.  मागील शैक्षणिक वर्षाच्या तुलनेत हे उत्पन्न सुमारे ३३ कोटींहून जास्त आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान शास्त्र विभागानं व्यक्त केला आहे. या काळात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**//<><><><><>//**